१ नियमीत फौजदारी प्रकरण क्र.११७/२००७

शासन–विरुध्द–रवि

निशाणी क्र. ५

**पुरावा फौ.प्र.सं.कलम २९९ प्रमाणे**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०१ यांची जबानी –**

**मी प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की –**

माझे नांव –जनार्दन रामेश्वर मिश्रा

वय –७० वर्षे, कामधंदा –सेवानिवृत्त ,

राहणार–केशव नगर, वरोरा, जि.चंद्रपूर

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे स.शा.अ. श्री. एस.आर.ठावरी यांचे मार्फत शपथेवर सुरु –**

०१. दि.०१/०७/२००७ रोजी मी भद्रावती पोलीस स्टेशनला पो.हवा. या पदावर कार्यरत होतो. त्यादिवशी माझी रात्री ८ ते दुस–या दिवशी दुपारी २ वाजेपर्यंत स्टेशन डायरी डयुटी होती. त्यादिवशी राजश्री रुद्रख ही पोलीस स्टेशनला फिर्याद देण्याकरीता आली होती. राजश्री ही रविची पत्नी होती. तिने घरगुती मारपीटीची तक्रार दिली होती. तिला चाकुने तिचे नव–याने हातावर मारले होते. त्यानंतर मी तिला मेडीकलला उपचाराकरीता पाठविले. त्याअनुषंगाने एम.एल.सी. अभिलेखावर सादर आहे. त्यावर फिर्यादीची सही आहे. मला दाखविण्यात आलेल्या रिपोर्टवर व प्रथम छापील खबर अहवालावर माझी सही व फिर्यादीचा अंगठा आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे.त्यास अनुक्रमे **नि.क्र.६ व ७** देण्यात येते.

आरोपी रवि हा गवराळा येथील रहीवासी होता.

**सरतपास पूर्ण.**

**उलट तपास–काही नाही. पुरावा फौ.प्र.सं.कलम २९९ प्रमाणे असल्यामुळे**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत, समक्ष,

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by JARUDE ASHWINI SHRIKANT
Date: 2026.07.17 16:23:27 +0530

दिनांकः– १७/०७/२०२६

**(ए.एस. जरुदे)**

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, भद्रावती